


39 वा
वार्षिक अहवाल
2025-2026

# Karmaveer Patsanstha, Sangli

## कर्मवीर भाऊराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्या; सांगली




संस्कृतीचा वारसा, अभिमानाचा ठेवा | आमचा प्रवास ज्ञानाच्या प्रकाशात | एकता हीच आमची ताकद | प्रेम, विश्वास आणि एकता हीच आमची शक्ती | विश्वास आणि पारदर्शकता, आर्थिक यशाची गुरुकिल्ली | मूल्यांची जपणूक, उज्वल भविष्याची हमी

## कर्मवीर परिवार – आमची ओळख – आमचे बळ

अनेक पिढ्या.. निरंतर विश्वास...



संस्थापक चेअरमन

## स्व. डॉ. आप्पासाहेब चोपडे



पद्मभूषण

# डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

# संचालक मंडळ



मा.श्रीमती भारती आप्पासाहेब चोपडे

चेअरमन



मा.ॲड.एस.पी.मगदूम

व्हा.चेअरमन



मा.श्री.रावसाहेब जिनगोंडा पाटील

संचालक



मा.डॉ.अशोक आण्णा सकळे

संचालक



मा.डॉ.रमेश वसंतराव ढबू

संचालक



मा.श्री. अे.के.चौगुले(नाना)

संचालक



मा.श्री. वसंतराव धुळाप्पाण्णा नवले

संचालक



मा.डॉ. एस.बी.पाटील (मोटके)

संचालक



मा.डॉ.चेतन आप्पासाहेब पाटील

संचालक



मा.सौ.चंदन नरेंद्र केटकाळे

संचालिका



मा.श्री.आप्पासो दादू गवळी

संचालक



मा.श्री. बजरंग भाऊसो माळी

संचालक



मा.श्री.अमोल विनायक रोकडे

संचालक



मा.डॉ.नरेंद्र आनंदा खाडे

तज्ञ संचालक



मा.श्री.लालासो भाऊसो थोटे

तज्ञ संचालक



मा.श्री.अनिल श्रीपाल मगदूम

मुख्य कार्यकारी अधिकारी



## अनेक पिढयांचा विश्वास..!

**भारतीय संस्कृतीची खरी ओळख म्हणजे संयुक्त कुटूंब पध्दती.** एकाच छताखाली आजी–आजोबा, आई–वडील, मुले आणि नातेवाईक प्रेमाने, आपुलकीने आणि परस्पर सहकार्याने राहतात. तेव्हा एक मोठे संयुक्त कुटूंब निर्माण होते. ही केवळ राहण्याची व्यवस्था नसुन संस्कार, मुल्ये आणि सामाजिक बांधिलकी जपणारी एक जीवनपध्दती आहे.

संयुक्त कुटूंबाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे एकता. कुटूंबातील प्रत्येक सदस्य सुख–दु:खात एकमेकांच्या पाठीशी उभा राहतो. संकटाच्या काळात आधार देतो आणि यशाच्या क्षणी आनंद वाटून घेतो ही संयुक्त कुटूंबाची खरी ताकद आहे. त्यामुळे प्रत्येक सदस्यांमध्ये सुरक्षिततेची आणि आत्मविश्वासाची भावना निर्माण होते.

एकत्र कुटुंब ही केवळ राहण्याची व्यवस्था नाही तर एकमेकांची काळजी, एकमेकाबद्दल आदर, प्रेम, एकमेकाप्रती त्याग आणि ससंस्कृतपणाचे उदाहरण आहे. त्याचप्रमाणे सभासद, ठेवीदार, कर्जदार, संचालक, सेवक यांच्यातील निस्वार्थ एकता कर्मवीर पतसंस्थेच्या प्रगतीची खरी ताकद आहे.

### कुटूंब–एकता, संस्कार आणि समृध्दीचे प्रतिक

एकाच छताखाली आनंदाने राहणाऱ्या अनेक पिढ्यांमधील आपलेपणा, परस्पर प्रेम, आपुलकीची भावना ही शब्दांपलीकडील असते. मोठ्या संयुक्त कुटूंबात मुलांवर उत्तम संस्कार होतात. जेष्ठांच्या सहवासातून त्यांना शिस्त, आदर, संयम, कर्तव्यनिष्ठा आणि सामाजिक मुल्ये शिकायला मिळतात. आजी आजोबांच्या अनुभवाचा लाभ नव्या पिढीला मिळतो आणि त्यामुळे जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता त्यांच्यात विकसित होते.

आर्थिकदृष्ट्याही संयुक्त कुटूंब महत्वाचे ठरते. संसाधनांचा योग्य वापर, खर्चाचे नियोजन आणि जबाबदाऱ्यांचे वाटप यामुळे हे कुटुंब अधिक सक्षम बनते. ‘ एकासाठी सर्व आणि सर्वासाठी एक ’ ही भावना प्रत्येक सदस्याला प्रगतीच्या मार्गावर घेऊन जाते. संयुक्त कुटूंबातील परस्पर विश्वास, सहकार्य, त्याग आणि समन्वय ही मुल्ये कोणत्याही संस्थेच्या यशासाठी देखील तितकीच आवश्यक ठरतात. जसे कुटूंबातील सर्व सदस्य एकत्र येऊन कुटूंबाची प्रगती साधतात, तसेच संस्थेतील सर्व कर्मचारी आणि पदाधिकारी एकत्रित प्रयत्नांनी संस्थेला यशाच्या शिखरावर पोहोचवू शकतात.

आजच्या बदलत्या काळातही संयुक्त कुटूंबाची संकल्पना आपल्याला एक महत्वाचा संदेश देते – एकता, प्रेम, परस्पर आदर आणि सामुहिक प्रयत्न यामधुनच खरी प्रगती साध्य होते. म्हणुनच मोठे संयुक्त कुटूंब हे केवळ समाजाचे नव्हे तर एक आदर्श व्यवस्थापन तत्वज्ञानाचेही उत्कृष्ट उदाहरण आहे. जिथे मनांची एकजुट, तिथेच समृध्दी आनंद आणि यश नांदते.

**संस्थेच्या यशाचा पाया :–**

संयुक्त कुटूंब ही भारतीय संस्कृतीची अमुल्य परंपरा ठरली आहे. प्रेम, विश्वास, सहकार्य आणि सामुहिक जबाबदारी या मुल्यांवर संयुक्त कुटुंबाची उभारणी झाली. प्रत्येक सदस्य आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून कुटूंबाच्या प्रगतीसाठी योगदान देत असतो. त्यामुळे संयुक्त कुटूंब नात्यांचा समुह नसुन एक सशक्त व्यवस्थापन प्रणाली आहे.

आपली संस्था देखील अशाच एका मोठ्या संयुक्त कुटूंबाप्रमाणे कार्यरत आहे. संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी, सभासद, ठेवीदार आणि ग्राहक हे सर्व या कुटूंबाचे महत्वाचे घटक आहेत. प्रत्येकाच्या सहकार्यामुळेच संस्थेची वाटचाल यशस्वी होत आहे.

जसे संयुक्त कुटुंबातील जेष्ठ सदस्य मार्गदर्शन करतात, त्याचप्रमाणे संस्थेतील अनुभवी नेतृत्व संस्थेला योग्य दिशा देते. तर युवा सदस्य आपला उत्साह नाविन्यपुर्ण विचार आणि कार्यक्षमतेने संस्थेच्या प्रगतीला नवी दिशा देत आहेत. मागील अनेक वर्षात संस्थेने प्राप्त केलेली यशस्वी कामगिरी, आर्थिक प्रगती आणि सामाजिक बांधिलकी ही सर्व आपल्या सामुहिक प्रयत्नाची फलश्रुती आहे. या यशामागे प्रत्येक सभासद, ग्राहक, अधिकारी आणि कर्मचारी यांचे मोलाचे योगदान आहे.

भविष्यातही एकता, पारदर्शकता, विश्वास आणि सेवाभाव या मुल्यांच्या आधारावर आपण सर्वजन एकत्रितपणे संस्थेची प्रगती अधिक उंचीवर नेऊ, हा विश्वास आहे. 'कुटूंब मोठे असणे ही फक्त ताकद नसते, तर कुटूंबातील मनांची एकता हीच खरी ताकद असते, आपली हीच एकता आपल्या संस्थेच्या उज्वल भविष्यासाठी प्रेरणादाई ठरेल. आपले मोठे कुटूंब हे आपले वैभव आहे. यामध्ये प्रेम, विश्वास, एकता आणि संस्कार यांचा सुरेख संगम आहे. या परंपरेचे जतन करुन ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली जबाबदारी आहे.

एक मजबूत कुटुंब जसे परस्पर सहकार्याने प्रगती करते, तसेच आपली संस्था सभासद, ग्राहक, कर्मचारी, संचालक आणि हितचिंतक यांच्या विश्वास व सहकार्यामुळे निरंतर प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. एकता, निष्ठा आणि परस्पर विश्वास हीच आपल्या संस्थेच्या यशाची प्रेरणादाई मुल्ये आहेत.

तर चला, मोठया संयुक्त कुटूंबाच्या महान परंपरेचा अभिमान बाळगुया, एकोप्याची भावना जपूया आणि प्रेम, विश्वास व एकमेकांच्या सहकार्याच्या बळावर उज्जल भविष्य घडवूया.

आपली संस्था आज प्रगतीपथावर अग्रेसर असून भविष्याचा वेध घेत आहे. संस्थेच्या कार्याचा विस्तार होत असताना आमचे कार्य हे कर्मवीर नावाचे आणि विचाराचे कुटूंब कसे विस्तारेल आणि सक्षम होईल या दिशेने सुरु आहे.

चेअरमन :– श्रीमती भारती आप्पासाहेब चोपडे





"वसुंधैव कुटूंबकम्" ही संज्ञा आम्ही अनुभवतो आहोत. यामुळे सर्वांचे कल्याण हा आमच्या कार्याचा केंद्र बिंदू घेऊन आम्ही काम करत आहोत.

गेल्या वर्षभरात सभासदांच्या सहकार्याचा आणि संस्थेवरील विश्वासाचा मी अतिशय चांगला अनुभव घेतला. सभासदांनी संस्थेवर आजवर दाखविलेल्या विश्वासामुळे आम्ही खुप समाधानी आहोत आणि आम्हाला भारावून गेल्याचा अनुभव होतो आहे. आपले सहकार्य आणि विश्वासाबद्दल आम्ही आपले मनापासून आभार व्यक्त करतो.गेल्या ३९ वर्षाच्या सेवेचा वारसा आपले कर्मवीर कुटूंब अतिशय चोखपणे सांभाळत आहे. आता या कुटूंबामध्ये परस्पर विश्वास, प्रेम आणि सर्वांची प्रगती यामध्ये आम्हाला समाधान जाणवते आहे. खऱ्या अर्थी आपले सभासद, ठेवीदार, कर्जदार, सेवक यावर्षी एक कुटूंब म्हणुन खंबीरपणे एकमेकासोबत उभे राहिलो. यातुन आपला एकमेकाबद्दलचा विश्वास, प्रेम, सद्भावना त्याचबरोबर आपले नाते वाढत्या काळाबरोबर प्रगल्भ होत गेले. एखाद्या कुटूंबामध्ये विश्वास ही फार महत्वाची गोष्ट आहे. ती काळाबरोबर कुटूंबाच्या सर्व सदस्यामध्ये संस्कार रुपाने रुजत जाते. तशी ती आपल्यामध्ये रुजली आहे. अगदी निशंकपणे एकमेकांच्या शब्दावर विश्वास ठेवण्या इतपत विश्वास आपल्या कर्मवीर नावाच्या कुटूंबामध्ये निर्माण झाला आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. कर्मवीर म्हणजे विश्वास – हे ब्रिद गेल्या चार पिढया त्यांच्या पुढच्या पिढीकडे देत आल्या आहेत. आपल्या विश्वासामुळे आम्हाला पुढील कार्याचे बळ मिळत आहे. कर्मवीर पतसंस्था या कुटूंबाचा विश्वासू घटक म्हणुन जीवनाच्या प्रत्येक वळणावर तुमच्या सोबत राहणार आहे.

संपलेले आर्थिक वर्ष अनेक बाबतीत स्मरणीय आहे. विपरीत आर्थिक स्थितीत देखील संस्थेने अनेक बाबतीत चांगली कामगिरी नोंदविली आहे. परस्पर विश्वास, उत्तम नियोजन, व्यवसायाची मुल्ये सांभाळत व प्रगतीची पूढची दिशा ठरवून कामगिरीमध्ये सातत्य राखण्यात आपण यशस्वी झालो आहोत. ठेवीमधील स्थैर्य आणि वाढ, योग्य कर्जाचे वितरण, नफा स्थिरता आणि खर्चाचे नियंत्रित प्रमाण हे योग्य प्रशासन आणि सभासदांचा संस्थेवरील विश्वास वृध्दींगत करणारे आहेत. आम्ही सभासदांना मुल्यवर्धीत सेवा देण्यासाठी नवनविन संकल्पना आपल्या व्यवसायात रुजवीत आहोत. संस्थेच्या पाच विभागीय कार्यालयात फ्रँकींग (स्टॅम्प) ची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच सभासदांची माहिती सुरक्षित राहण्यासाठी संपुर्ण संगणक प्रणाली फायरवॉल सुरक्षेखाली आणुन आपल्या कुटूंबातील सदस्यांच्या माहितीची काळजी संस्थेने घेतली आहे.

आपल्या कर्मवीर पतसंस्थेच्या कुटुंबामध्ये नव्या पिढीचे स्वागत आहे. या नव्या पिढीसाठी संस्थेचे कामकाज जास्तीत जास्त आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत करण्याचा आमचा प्रयत्न आहे. जुन्या पिढीचे समाधान आणि नव्या पिढीचे तंत्रज्ञान यांचा सुरेख संगम आपल्या संस्थेमध्ये पहायला मिळेल. कारण कुटुंब बहरत जाण्यासाठी नव्या पिढीचे कुटूंबात सामील होणे आवश्यकच आहे. कुटूंबात नव्या माणसाच्या येण्याने आनंद वाढत जातो, नवीन सभासद, ठेवीदार, हितचिंतक यांचे या विस्तीर्ण कर्मवीर कुटूंबात मनापासून स्वागत आहे. आमच्या संचालक मंडळाने या कुटूंबातील प्रत्येक सदस्याच्या प्रगतीसाठी सुयोग्य प्रयत्न केले आहेत. आमच्या कुटूंबाचा भाग असणारे सभासद, सल्लागार, कामाप्रती आनंद मानणारे सेवक या सर्वाच्या सहकार्याशिवाय संस्थेची सातत्यपूर्ण प्रगती शक्य झाली नसती. त्यामुळे या कुटूंब सदस्यांचे आम्ही मनापासून धन्यवाद व्यक्त करतो.

येणाऱ्या युगाला आपण सर्व मिळूनच सामोरे जाणार आहोत. त्यामुळे आपल्या एकत्र शक्तीच्या पुढे कोणतेही संकट मला मोठे वाटत नाही, कारण एखाद्या कुटुंबांची हीच तर खरी शक्ती असते. तुमच्या सहकार्याची साथ तर सतत आमच्या सोबत आहेच, म्हणून आम्ही एखादा धाडशी निर्णय घेण्यासाठी पुढे पाऊल टाकतो. कारण तुमचे लाखो हात आमच्या मदतीला आहेत याची आम्हाला खात्री आहे. आमची भिस्त या कुटुंबातील तरुण पिढीवर आहे. त्यांची आमच्या सोबत असणारी मोठी संख्या हे आमच्या विस्तारणाऱ्या कुटुंबाचे दर्शक आहेत. हा सेवेचा वारसा आणि संस्थेच्या वाढत्या विस्ताराचे फायदे या नव्या पिढीच्या सक्षमीकरणासाठीच आम्ही उपयोगात आणतो आहोत.

### एकमेकांच्या हिताची काळजी :–

आज कर्मवीर पतसंस्था आणि आपण सर्व एकत्र मिळून प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष एकमेकांची काळजी घेतली व घेत आहोत. त्यामुळेच आज संस्था मोठी झाली आहे. म्हणुन संस्था आज सदस्यांच्या मोठ्या गरजा पुर्ण करण्यास सक्षम बनली आहे. तुमच्या विश्वासाला साजेशी कामगिरी करीत आहे.

### मार्गदर्शकाची भुमिका :–

या कुटुंबाचा भाग बनुन आपण सर्वजन संस्थेला गरजेच्या वेळी योग्य मार्गदर्शन करीत आहात आणि संचालक मंडळाने देखील तेवढयाच सहहृदयपुर्ण तुमच्या सुचना ऐकून घेतल्या आहेत. हे एका सुसंस्कृत कुटूंबांचे लक्षण नाही तर दुसरे काय आहे.

### पारदर्शकता :–

पारदर्शकता हे संस्थेच्या प्रमुख अंगापैकी एक भाग आहे. आम्ही संचालक मंडळ संस्थेच्या कार्यामध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता ठेवून संस्थेच्या कार्याची माहिती सभासदांच्या पर्यंत पोहोचविण्याचे काम करतो आहोत. यास सभासदांचे देखील योगदान लाभत आहे.

### सुरक्षितता:–

सभासदांच्या पै आणि पै ची सुरक्षितता यासाठी आमचे सारे प्रयत्न आहेत. सभासदांच्या कष्टाची आम्हाला परिपुर्ण जाणीव आहे. ही जाणीवच आम्हाला आमच्या कर्तव्याशी बांधील ठेवते आहे.

### दुरदृष्टी :–

सभासदांच्या विकासाची दृष्टी आमच्यामध्ये दुरदृष्टीची निर्मिती करीत आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना आम्ही त्याच्या दिर्घकालीन परिणामांचा विचार करुनच घेत आहोत. त्यामुळे कदाचित तुम्हाला निर्णयामध्ये विलंब होतोय असे वाटेल पण तसे नाही.

### नैतिक मुल्यांचे जतन :–

एकत्र कुटूंब ही अशी सुंदर व्यवस्था आहे जिथे नैतिक मुल्यांना अनन्य साधारण महत्व आहे.

### सुरक्षितता आणि आधार :–

आपल्या अमुल्य ठेव्याची सुरक्षितता एक ट्रस्टी म्हणुन संस्था निभावत आहे, तर आडचणीच्या वेळी कर्मवीर संस्थेने तिच्या कुटुंबातल्या सदस्यांना मोलाचा आधार देवून कुटूंब प्रमुखाची भुमिका तेवढ्याच सक्षमपणे निभावली आहे.

प्रगतीची ही यशोगाथा अशीच पुढे सुरु ठेवूया ! कुटूंब प्रमुख म्हणून कर्मवीर परिवाराचा भाग झाल्याबद्दल आपणांस धन्यवाद देते !

# कर्मवीर भाऊराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित., सांगली
## प्रधान कार्यालय : सांगली कोल्हापूर रोड, सांगली

## ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

(फक्त सभासदांकरिता)

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते कि, संस्थेच्या सन २०२५ – २०२६ या सालाची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक ११/०९/२०२६ ई. रोजी सकाळी १० .०० वाजता 'दैवज्ञ समाज भवन, कोल्हापूर रोड, सांगली.' येथे आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहुन सहकार्य करावे हि विनंती.

### सभेपुढील विषय

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे .
२) मा.संचालक मंडळाने दि. ३१/०३/२०२६ अखेर संपणाऱ्या वर्षाचा सादर केलेला व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा- तोटा पत्रके मंजुर करणे व स्विकारणे.
३) संस्थेस सन २०२५-२०२६ या सालात झालेल्या नफ्याची नोंद घेवून नफा विभागणीस मंजुरी देणे.
४) सन २०२५-२०२६ सालच्या वैधानिक लेखापरिक्षकांनी दिलेल्या वैधानिक लेखा परिक्षण अहवालावर चर्चा करणे व अहवाल स्वीकारणे.
५) सन २०२५-२०२६ मध्ये झालेल्या खर्चास , अंदाजापेक्षा ज्यादा झालेल्या खर्चास व सन २०२६-२०२७ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६) संस्थेचे संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे .
७) सन २०२६ – २०२७ साठी अंतर्गत हिशोब तपासणीस व वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणुक करणेबाबत विचार करणे.
८) सन २०२४ -२०२५ सालाचे लेखा परिक्षणाचा अहवाल व त्यावरील निबंधकांचे निर्देश सादर करणे.
९) नियामक मंडळाने दिलेला आदर्श पोटनियम स्वीकारणेबाबत
१०) वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसणाऱ्या सभासदांच्या गैरहजेरीस मंजुरी देणे .
११) मा. अध्यक्षसाो यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

येणेप्रमाणे असे. कळावे.
सांगली .

दिनांक २७/०८/२०२६

**श्री. अनिल श्रीपाल मगदुम**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

**सुचना :-**

१) सभासदांना काही सुचना करावयाच्या असतील तर त्यांनी दि. ०७/०९ /२०२६ पर्यंत प्रधान कार्यालयात लेखी आणुन द्याव्यात.
२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच दिवशी त्याठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेतली जाईल, त्यास कोरमचे बंधन राहणार नाही.
३) सभासदांचा मंजूर झालेला डिव्हीडंड त्यांचे संबंधीत शाखेतील सेव्हींग खातेस वार्षिक सभेनंतर वर्ग केला जाईल.
४) सभासदांनी संस्थेच्या नजीकच्या शाखेत संपर्क साधून ईमेल तसेच व्हॉट्सअप सुविधा असलेला मोबाईल क्रमांकाची नोंद शाखेच्या दप्तरी करून घ्यावी. तसेच आपली केवायसी पूर्तता करून घ्यावी.
५) सन २०२५ – २०२६ चा वार्षिक अहवाल नजीकच्या शाखेत तसेच संस्थेच्या www.karmaveerpathsanstha.com या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

# सन २०२५ – २०२६ या आर्थिक वर्षाचा संस्थेने केलेला प्रगतीचा संचालक मंडळाचा अहवाल

**सन्माननिय सभासद बंधू आणि भगिनींनो,**

तुम्हां सर्वांना नविन आर्थिक वर्षाच्या मनापासून शुभेच्छा देते आणि अशी आशा करते कि, तुम्ही आणि तुमचे कुटूंब सुखी आणि समाधानी आहात .

सन २०२५ – २०२६ मध्ये संचालक मंडळाच्या जबाबदारी मध्ये आम्ही सर्वानी थोडासा बदल केला आणि आर्थिक वर्ष सन २०२५ – २०२६ मध्ये दिनांक ३१/०७/२०२५ पासून चेअरमन पदाची जबाबदारी माझ्यावर म्हणजे श्रीमती भारती आप्पासाहेब चोपडे यांच्यावर आणि व्हाईस चेअरमन पदाची जबाबदारी ॲड. एस. पी. मगदूम यांच्यावर सोपविली. अर्थातच ती पार पाडण्यासाठी सर्वच संचालक मंडळाचे योगदान आणि भुमिका अतिशय चांगली राहिली, हे वेगळे सांगायला नको. सुरुवातीपासूनच आणि या वर्षात आमचे संचालक मंडळ, सर्व सभासद आणि सेवक वर्ग यांनी कर्मवीर परिवार म्हणुन अतिशय मोलाची कामगिरी पार पाडली. त्याबद्दल मी सर्वांना अगदी मनापासून धन्यवाद देते.

सन २०२५ – २०२६ च्या अहवालाच्या माध्यमातून संस्थेने साध्य केलेल्या आकडेवारीचा प्रगतीदर्शक आढावा आणि अर्थ कारणासोबत अन्य बाबतीत केलेल्या सन्मानजनक कार्याचा आढावा आणि संस्थेच्या प्रगतीची पुढील दिशा सन्माननिय सभासदांच्या दृष्टीस यावी या उद्देशाने आपल्या समोर सादर करीत आहोत. हा अहवाल आपणांस संस्थेचे धोरण, सभासदांप्रती संस्थेने घेतलेले दायित्व याची ग्वाही देणारा आहे.

सन २०२५ – २०२६ चा वार्षिक अहवाल तुमच्या समोर सादर करताना मनामध्ये आनंद आहे, त्याचबरोबर तुमच्याबद्दल कृतज्ञतेची भावना देखील आहे. संपलेल्या आर्थिक वर्षात आलेल्या आव्हानांना सामोरे जात प्रगतीचा रथ पुढे घेऊन जाणेची भुमिका पार पाडत संस्थेला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाण्याचा संचालकांनी सर्वार्थाने प्रयत्न केला.

आपल्या कर्मवीर पतसंस्थेच्या सन २०२५–२०२६ च्या प्रगतीदर्शक कार्याचा आढावा सभासदांना सादर करताना संचालक मंडळाला मनपुर्वक आनंद वाटतो आहे,

**संस्थेची प्रगतीदर्शक आकडेवारी**

**आकडेवारी रु. लाखात**

| तपशील | ३१/०३/२०२६ | ३१/०३/२०२५ | वाढ/घट | वाढीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| भागभांडवल | ५८८९.६० | ४३०६.३२ | १५८३.२८ | ३६.७७% |
| ठेवी | १२९३४८.८० | १२४५९२.५७ | ४७५६.२३ | ३.८२% |
| कर्जे | ९७४७३.२६ | ९५३०४.८९ | २१६८.३७ | २.२८% |
| खेळते भांडवल | १६०६३४.१० | १५३२१०.७६ | ४७७७.१९ | ४.८४% |
| निव्वळ नफा | ७६४.४९ | १५,५५.०० | –७९०.५१ | –५०.८४% |
| राखीव निधी | ९०८८.७३ | ८७२५.५४ | ३६३.१९ | ४.१६% |

### सहकार क्षेत्रामध्ये झालेल्या घडामोडी

आर्थिक वर्षात सहकार क्षेत्रात आपल्या आजुबाजुला आपल्या कळत नकळत अनेक घडामोडी झाल्या. त्याचा चांगला वाईट परिणाम सहकार क्षेत्रावर होत असतो. अशा घटनांमुळे इतर तत्सम संस्थांच्या प्रगतीवर परिणाम होत असतो. या सर्वावर मात करीत आपल्या संस्थेने प्रगती करण्यात यश मिळविले आहे.

केंद्रात सहकार मंत्रालय निर्मितीमुळे सहकाराच्या प्रगतीसाठी अनेक निर्णय घेतले जात आहेत. संपुर्ण सहकार क्षेत्रच एका छताखाली आणण्यासाठी प्रयत्न होत आहेत. ते एक दृष्टीने चांगले आहे. त्यामुळे सहकाराचे एकसंघ नियंत्रण, सहकारी संस्थाचे आधुनिकीकरण यासाठी माहितीचे संकलन, सहकारी संस्थांना मजबुती देण्याचे प्रयत्न, सशक्त प्रशासन निर्मिती करण्याच्या दिशेने या महत्वाच्या बाबी घडल्या त्यामुळे संस्थांना देखील त्या दिशेने बदलावे लागते आहे.

अंतर्गत नियंत्रण मजबुत करण्यासाठी नियामक मंडळाच्यावतीने वर्षभरात काही नवनविन परिपत्रके काढण्यात आली. त्याचा परिणाम संस्थांच्यावर झाल्याचे दिसते आहे. नवीन पोटनियम मसुदा आला. त्यामुळे देखील संस्थांच्यामध्ये नवीन की जुना पोटनियम कशा प्रमाणे काम करायचे असा प्रश्न निर्माण झाला. कर्ज मर्यादेत घट, कर्ज विषयक नविन नियम, वाढत जाणारी एन पी ए ची तरतुद, अहवाल रचना विषयक परिपत्रक. अशी परिपत्रके वर्षभरात निघाली. या सर्वांचा अभ्यास संस्थेने करुन त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला व त्याचा संस्थेच्या कामकाजात उपयोग करुन घेतला.

आपल्या संस्थेने जे लोक अद्याप आर्थिक प्रवाहापासून दुर आहेत त्यांना व्यवहाराच्या माध्यमातून सभासद करुन घेणे, त्यांच्या अल्पठेवी गोळा करणे, कर्जाद्वारे मदत करणे, सहकाराचे महत्व समाजातील खालच्या आर्थिक स्तरापर्यंत पोहचविण्यासाठी आर्थिक सेवा देण्याचे प्रयत्न संस्था करीत आहे.

### सहकार संवर्धनाला हातभार

संस्थेचे सांगली येथील मुख्य कार्यालयात २०० व्यक्ती क्षमतेचे आधुनिक सभागृह आहे. त्याचा उपयोग संस्थेच्या विविध कार्यक्रमांसाठी होत आहे. या सभागृहात असलेल्या आधुनिक सोईमुळे येथे सहकारी क्षेत्रास चालना देणारे अनेक कार्यक्रम संपन्न होत आहेत. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष व ७२ वा राष्ट्रीय सहकार सप्ताह निमित्त या सभागृहात नविन सहकार धोरण व नविन पोटनियमाचा मसुदा तयार करण्यासाठी सुचना मागविण्याकरिता राज्य स्तरावरील कार्यकर्त्यांची विशेष सभा संपन्न झाली. महत्वाची दोन प्रशिक्षणे याच सभागृहात संपन्न झाली. तसेच जिल्ह्यातील लेखापरिक्षकांचे विशेष प्रशिक्षण येथे संपन्न झाले. या निमित्ताने सहकारामध्ये सुधारणा बाबत महत्वपुर्ण चर्चा झाली. अशा कार्यक्रमातून सहकाराचे मंथन आपल्या संस्थेत होत आहे.

आपसात ज्ञानाचे आदानप्रदान करण्यासाठी तसेच सहकाराची संस्कृती जपणे , चर्चा घडवून आणणे यासाठी सोईचे ठिकाण म्हणून आपल्या संस्थेची निवड करण्यात आली हे आनंदाने नमुद करावेसे वाटते.

### आमची प्राथमिकता

आपल्या कुटूंबातील प्रत्येक सदस्य म्हणजेच ' सभासद प्रथम ' या तत्वावर विश्वास ठेवून काम करणारी आपली संस्था आहे. आपल्या प्रत्येक शाखेत सभासदास तत्पर, पारदर्शक आणि नम्रतापुर्ण सेवा देणे आणि ती सभासदास मिळाली पाहिजे ही आमची प्राथमिकता आहे. भविष्यात सभासदांच्या वाढत्या अपेक्षा पुर्ण करणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान संस्थेमध्ये आणणे, त्यासाठी तत्पर सेवक तयार करणे आणि या सर्वातुन संस्थेचा सर्वांगिण पाया भक्कम करणे यास आम्ही कटिबध्द आहोत.

### सभासद आणि कर्मवीर नाते

जसा सामान्य माणुस हा कर्मवीरांच्या कार्याचा केंद्रबिंदु होता, तशीच सभासदांप्रती आत्मीयतेची भावना आमच्यामध्ये आहे. सभासदाची उन्नती ही आमच्या दृष्टीने महत्वाची आहे. त्याच दिशेने आमच्या निर्णयाची दिशा आहे. सातत्याने ठेवीला उत्तम व्याजदर, कर्जास माफक व्याजदर आणि चांगला लाभांष याद्वारे संस्थेने सभासदांविषयीची आत्मीयता दाखवून दिली आहे.

सामान्य शेतकरी,कामगार, दुर्बल घटकांना बचत आणि स्वावलंबनाची शिकवण देवून त्यांना आर्थिक उन्नतीचा मार्ग दाखविणे हे आमचे उद्दीष्ट आहे. सभासदांनीही संस्थेच्या प्रगतीसाठी असेच योगदान द्यावे ही आमची इच्छा आहे. 'सभासदांची उन्नती हीच कर्मवीर पतसंस्थेची उन्नती ' हा विचार कर्मवीर पतसंस्थेच्या प्रगतीचे सुत्र आम्ही मानले आहे.

### रु. १०० कोटी अधिकृत भागभांडवल असणारी संस्था

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु.१०० कोटी करणेचा पोटनियम दुरुस्ती प्रस्ताव संस्थेने पाठविला होता. त्यास दिनांक २१/०८/२०२५ रोजी मंजुरी मिळाल्याने संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु.१०० कोटी झाले आहे. यामुळे संस्थेला रु.१०० कोटी पर्यंत भागभांडवल गोळा करता येणार आहे.

आपल्या कर्मवीर कुटूंबामध्ये सामील होण्यासाठी नविन सभासदांचा अतिशय उत्तम प्रतिसाद आहे. त्यामुळे संस्थेचे हे विस्तीर्ण कुटूंब आणखी विस्तारत चालले आहे. या कुटूंबातील सर्वाची प्रगती व्हावी या दिशेने आम्ही कुटुंबाचे प्रमुख म्हणून धोरणे राबवित आहोत. त्याला अतिशय चांगले यश लाभते आहे. या आर्थिक वर्षामध्ये संस्थेच्या सभासद संख्येमध्ये २४३७ ने वाढ झाली. त्याचे प्रमाण ३.६०% राहिले. तर राजीनामा व अन्य कारणाने ४०० सभासद कमी झाले.

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु.१००,००,००,०००/- ( अक्षरी रु. शंभर  कोटी मात्र ) इतके आहे. हे भागभांडवल १ कोटी भागामध्ये विभागले असून १ भागाची किंमत रु.१००/- इतकी आहे. आर्थिक वर्षात वसुल भागभांडवलात रु. १५,८३,२८,२०० =०० ने वाढ झाली. आणि वर्षाअखेरीस संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ५८,८९,६०,४००=०० इतके झाले आहे. संस्थेच्या भागभांडवलामधील वाढ अतिशय उत्तम असून भागभांडवल वाढीची प्रमाण ३६.७७ टक्के इतके आहे .

**ठेवी**

सध्या आपल्या परिसरात अनेक राज्य आणि परराज्यातील संस्था व बँका नव्याने येताना दिसत आहेत. त्यामुळे संस्थांना ठेवीदार टिकविण्यासाठी प्रयत्न करावे लागत आहेत. पण आपल्या संस्थेने ठेवीदारांचे सतत हित जतन करीत वेगवेगळया ठेव कालावधी साठी आकर्षक व्याजदर ठेवले. त्याचे ठेवीदारांनी स्वागत केले.

आर्थिक वर्ष अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु.१२९३,४८,८०,४८८=९४ इतक्या राहिल्या आहेत. ठेवीमध्ये रु.४७,५६,२३,०२५=८० इतकी वाढ झाली. या स्पर्धात्मक वातावरणामुळे व काही अनपेक्षीत कारणांमुळे ठेवीमध्ये अल्पप्रमाणात वाढ झाली. पण अशा  विपरीत स्थितीत आपल्या ठेवी वाढल्या हे सभासदांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे. त्याबद्दल ठेवीदारांना मनापासून धन्यवाद देते.

ठेवीदाराच्या गरजेनुसार त्याला हव्या त्या मुदतीला ठेव ठेवता यावी व त्याला व्याजाचा लाभ घेता यावा व गरजेनुसार ठेव काढता यावी म्हणुन संस्थेने कमीत कमी ७ दिवस, ३० दिवस, ४६ दिवस, १८१ दिवस, ३६६ दिवस असे मुदतीचे पर्याय उपलब्ध करुन दिले आहेत.

**सभासदांसाठी विशेष ठेव योजना**

आर्थिक वर्षात कर्मवीर जयंती व गणेशोत्सव, दिपावली पाडवा, नववर्ष शुभारंभ यावेळी वाढीव व्याजदराच्या खास योजना सभासदांसाठी आणल्या. सर्व ठेवीदारांसाठी द.सा.द.शे. ९.५० टक्के व जेष्ठ नागरीक ठेवीदारासाठी ९.७५ टक्के इतका व्याजदर या कालावधीत देण्यात आला. असंख्य ठेवीदारांनी या योजनांचा लाभ घेतला. प्रत्येक योजनेत संस्थेकडे ४० कोटी ते अधिक ठेव वाढ झाली. इतका उत्तम प्रतिसाद ठेवीदारांनी या योजनांना दिला.

जास्तीत जास्त ठेवीदारांना वाढलेल्या व्याज दराचा लाभ घेता यावा यासाठी जाहिरातीच्या माध्यमातून त्याच्यांपर्यंत व्याज दराची माहिती पोहचविण्याचा संस्थेने चांगला प्रयत्न केला. ठेवीदारांनी त्याचा लाभ घेतला.

**कर्ज वितरणामध्ये समाधानकारक वाढ**

सहकार खात्याने ठेवीच्या प्रमाणात कर्ज मर्यादेबाबत मार्गदर्शक सुचना काढल्यानुसार त्याचे पालन करीत संस्था कर्ज वितरण करीत आहे. यापुर्वी संस्थेने लहान कर्जाचे चांगले वितरण केले होते. त्याद्वारे गरजू व होतकरु सभासदांना कर्जाच्या रुपाने मदतीचा हात देवून त्यांचे आर्थिक जीवन उंचावण्यासाठी संस्थेने उल्लेखनिय कार्य केले आहे. पण नविन नियमांचे बंधन पाळत संस्थेला कर्ज वितरण ठरवून दिलेले प्रमाणात करणे भाग आहे. अल्पमुदत कर्जामध्ये संस्थेला उत्पन्नाचा चांगला पर्याय आहे पण नियमानुसार एका कर्ज प्रकारामध्ये ठराविक रकमेपेक्षा जास्ती कर्ज वितरण करता येणार नसल्यामुळे संस्थेकडे मागणी असून देखील या प्रकारामध्ये कर्ज वितरण करता आले नाही.

संस्थेने आर्थिक वर्षात तारणी कर्ज वितरणावर अधिक भर दिला. संस्थेकडे कर्जास चांगली मागणी राहिल्यामुळे कर्ज वितरण प्रमाण चांगले राहिले. त्यामध्ये तारणी कर्जाचे प्रमाण जास्त आहे. परिपत्रकीय सुचनानुसार एकूण कर्जामध्ये प्रत्येक कर्ज प्रकाराचे कर्ज वाटप प्रमाण योग्य राखले आहे. एकाच कर्ज प्रकारातील जादा कर्ज वाटपाचा धोका कमी करण्यासाठी संचालक मंडळाने तारणी कर्ज वितरण करण्यावर भर दिला.  कर्ज वितरणाच्या पध्दतीमध्ये बदल केला. कर्जदाराची संपुर्ण माहिती घेऊन कर्ज वितरणाची पध्दत पुर्वी पेक्षा सक्षम करण्यात आली. त्यामुळे कर्जामध्ये संख्यात्मक पेक्षा गुणात्मक वाढ चांगली झाली हे आवर्जुन नमुद करावेसे वाटते.

संस्थेच्या कर्जात मागील वर्षात तुलनेत रु. २१,६८,३७,१६२=६६ इतकी वाढ झाली. मार्च २०२६ अखेर संस्थेचे येणे कर्ज रक्कम रु. ९७४,७३,२६,२५७=८७ इतके आहे. कर्ज वसुलीस प्राधान्य दिल्यामुळे व विनातारणी कर्जाचे वितरण कमी केल्यामुळे कर्जामध्ये मोठी वाढ झाली नाही. कर्जाचे ठेवीशी प्रमाण ७१.२०% आहे. कर्ज अर्जांची योग्य छाननी करुन त्याद्वारे कर्ज वितरणाची पध्दत संस्थेने पुर्वीपासून घेतली आहे.

कर्जाची जोखीम कमी करण्यासाठी कर्ज अर्जाची छाननी प्रक्रिया तीन पातळयावर करण्यात आली आहे. शाखा पातळी, विभागीय अधिकारी व कर्ज विभाग या पातळयांवर कर्ज अर्ज व कागदपत्रांची छाननी प्रक्रीया ठेवल्यामुळे कर्जातील कायदेशीर त्रुटी कमी होण्यास मदत होत आहे. कर्ज छाननीच्या वेळी कर्जदाराचे घर, ऑफीस या ठिकाणी संस्थेचे अधिकारी यांच्याकडून भेट देवून त्याचा सविस्तर वृत्तांत अर्जासोबत जोडला जातो. सीबील रिपोर्टची मदत घेतल्यामुळे कर्जाचे जोख़ीम व्यवस्थापन करण्यात संस्थेला मदत होत आहे.

### अल्पमुदत / जामिनकी कर्जाद्वारे सामान्याना बळ

अल्पमुदत किंवा दोन जामिनदार देऊन कर्ज मिळविणे हे सामान्य सभासदांसाठी त्यांच्या आडचणीला ऐनवेळचा आर्थिक आधार असतो. आपल्या संस्थेच्या ठेवीचा विचार करता आपली ही कर्जाची मर्यादा पुर्वी ३ लाखापर्यंत होती. नियामक मंडळाने ती रु.१ लाख केली. पुन्हा तिची मर्यादा वाढविली. यामध्ये संस्थेच्या एकूण कर्जाच्या २० टक्के पर्यंत एकूण कर्ज रक्कम देता येईल असा नियम आहे.

पण लहान व्यापारी, विक्रेते यांना खेळत्या भांडवलाची निकड म्हणून, एखाद्या सभासदाचा एखादा ऐनवेळी उद्भवणारा खर्च यासाठी आपले जामिनकी कर्ज महत्वाचा दुवा ठरले आहे. अनेक कर्जदार हे कर्ज वर्षाच्या आत परतफेड करतात. यातून त्यांनी स्वतःचे भांडवल उभा केले आहे. तरी कर्जदाराना विनंती आहे कि त्यांनी कर्जाची दरमहा परतफेड करुन आत्मनिर्भर व्हावे.

### सोने तारण कर्ज

सभासदांना सोनेतारण कर्जाच्या माध्यमातून जलद पैसा उभारता येण्यासाठी अल्पवेळेत सोने तारण कर्ज उपलब्ध करण्याची सोय संस्थेने केली आहे. सभासदांच्या गरजेनुसार त्यांना रु. १०५०० पासून ते ११६०० पर्यंत प्रतिग्रॅम रक्कम देण्याची कर्ज योजना संस्थेने केली. त्याला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. सोनेतारण कर्ज वाटपावर नियामक मंडळाने वाटप मर्यादा घातलेली नाही तसेच सोने तारण हे सुरक्षित कर्ज असल्यामुळे संस्थेने सोनेतारण कर्जाचे चांगले वाटप केले आहे. सध्या सोनेतारण कर्जामध्ये केलेल्या कर्जवाटपाने रु. १५० कोटीच्या पुढचा टप्पा पुर्ण केला आहे. एकूण कर्जामध्ये सोनेतारण कर्जाचे वाटप १५ % च्या वर आहे.

### शाखा विस्तार

आमच्या दृष्टीने शाखा विस्तार हा फक्त व्यवसाय वाढविण्या इतपत मर्यादीत विषय नाही. ग्राहकांनी आमच्याकडे हक्कपुर्वक केलेल्या विनंतीस अनुसरुन काही नविन शाखा सुरु करुन त्यांना आपल्या कर्मवीर परिवारामध्ये सामिल करुन घेण्यात आले.

आमची विनम्र, जलद व विश्वासपूर्ण सेवा त्यांच्यापर्यंत पोहोचविणे ही आमची प्रामाणिक भावना आहे. शाखा विस्तारामुळे नवनविन सभासद संस्थेशी जोडले जातात. ग्रामीण भागात त्यांना आर्थिक सेवा मिळतात. त्यामुळे भविष्यकाळाचा विचार करुन संचालक मंडळ शाखा विस्ताराचा निर्णय घेत असते. मागील काही वर्षात संस्थेने सभासदांच्या मागणीनुसार अनेक गावामध्ये शाखा विस्तार केला. त्याला उत्तम प्रतिसाद लाभला आहे. तसेच आणखी बऱ्याच गावामध्ये शाखा उघडणेत यावी असा सभासदांचा आग्रह असून त्यासाठी ते पुर्ण सहकार्य करतील याची ग्वाही दिली आहे. त्याला अनुसरुन संस्थेने दिनांक २२/०९/२०२५ रोजी रुई ता. हातकणंगले व दिनांक ०२/१०/२०२५ रोजी उचगांव ता. करवीर या ठिकाणी नव्याने शाखा सुरु केल्या. या शाखांना सुरुवातीपासूनच सभासदांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. संस्थेचे कामकाज मुख्यालयासह ६६ शाखाद्वारे सुरु आहे.

याव्यतिरिक्त काही शाखा संस्थेस मंजुर आहेत, पण संचालक मंडळाने विचारपुर्वक व अभ्यासपुर्वक या शाखा सुरु करणेचा निर्णय घेऊन कोणतीही घाई न करता सध्या कार्यरत असलेल्या शाखा आर्थिक सक्षम करुन उर्वरीत शाखा पुढील आर्थिक वर्षात सुरु कराव्यात असे धोरण ठरविले आहे.

### कर्मवीर अल्पबचत खात्याद्वारे बचत संकलन

संस्थेच्या कर्मवीर अल्पबचत ठेव (पिग्मी) योजनेमुळे सभासद, छोटे व्यापारी यांना लहान लहान रकमेची नियमित बचत करण्यास मदत होत आहे. संस्थेचे २७५ पिग्मी प्रतिनिधी नियमित आमच्या २५००० पेक्षा अधिक ग्राहकांशी प्रत्यक्ष संपर्क करुन त्यांची अल्पबचत गोळा करतात. यामुळे सभासदांना बचतीची सवय तर लागली आहेच शिवाय त्यांचा संस्थेवरील विश्वास वृध्दींगत झाला आहे. अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती, लघु व्यावसायीक, कामगार, शेतकरी व सर्व सामान्य यांच्या सोईनुसार थोडी थोडी रक्कम या योजनेत जमा करतात. हा निधी त्यांच्या गरजेवेळी उभा राहतो. पिग्मी प्रतिनिधींच्या सातत्यपुर्ण प्रयत्नामुळे संस्थेचे व ग्राहकांचे आत्मीयतेचे नाते तयार झाले आहे.

### शाखा स्थलांतर

बदलत्या काळाबरोबर सभासद, ग्राहकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन नविन शाखा सुरु करणे, विद्यमान शाखांचे नुतणीकरण करणे, त्याला आधुनिक सेवा व कार्यालयाची जोड देणे याद्वारे सभासदांना त्यांच्या जवळच्या परिसरात गुणवत्तापुर्ण सेवा देण्याचा आमचा सततचा प्रयत्न आहे. शाखांच्या प्रगतीचा आढावा घेऊन व ग्राहकांची होणारी गैरसोय ध्यानात घेऊन खालील शाखांचे आर्थिक वर्षात सुसज्ज व मध्यवर्ती ठिकाणी स्थलांतर केले. त्याचे ग्राहकांच्या मध्ये समाधान आहे. १) शाखा रामानंदनगर २) शाखा नागांव व शाखा कुंभोजचे नुकतेच स्थलांतरण करण्यात आले.

शाखा जयसिंगपूर करिता भाडयाने आपल्याच वापरात असलेली जागा संस्थेने खरेदी केली. त्यामुळे जयसिंगपूर शाखेचे संपुर्ण कार्यालय आता स्वमालकीच्या जागेत कार्यरत आहे. शाखा अंकलीच्या इमारतीचे विस्तारीकरण केलेल्या ठिकाणी अन्य शाखांसाठी रेकॉर्ड रुम तयार करण्यात आली आहे.

### ६९७२० सदस्यांचे कुटूंब

संस्थेची सभासद संख्या ही संस्थेची अतिशय मजबूत बाजू आहे. संस्थेची सभासद संख्या आर्थिक वर्षाच्या शेवटी ६९७२० इतकी झाली आहे. या संपन्न कुटूंबामध्ये समावेश व्हावा अशी अनेकांची इच्छा आहे. त्या सर्वांचे आम्ही मनापासून स्वागत करतो. आपले सभासद संस्थेचे जास्तीत जास्त भाग धारण करण्यासाठी नेहमी इच्छूक आहेत. यावर्षी संस्थेच्या भागभांडवलात विक्रमी शेअर्स रक्कम जमा झाली .

सभासदांच्या जीवनामध्ये आर्थिक उन्नती आणण्यासाठी कर्मवीर पतसंस्थेचे अविरत प्रयत्न सुरु आहेत. प्रत्येक सभासदापर्यंत आम्ही प्रत्यक्ष पोहचू शकत नसलो तरी त्यांच्या हिताची काळजी संस्थेचे संचालक आणि सेवक घेत असतात.

### संस्थेचे स्थैर्य दर्शविणारा स्वनिधी

संस्थेने निर्माण केलेला स्वनिधी हा संस्थेचे स्थैर्य निश्चित करणारा महत्वाचा घटक मानला जातो. संस्थेची दिर्घकालीन प्रगती मोजताना किंवा सर्वच माणकामध्ये स्वनिधी प्रथम विचारात घेतला जातो. संस्थेची मजबुती ठरविताना, तिची जोखीम पेलण्याची क्षमता विचारात घेताना आणि भविष्यातील विस्तार विचारात घेताना स्वनिधी हा महत्वाचा पाया समजला जातो. स्वनिधी हा सभासदांच्या विश्वासाचे द्योतक असून संस्थेने भागभांडवलाची मजबूत उभारणी करुन, तसेच नफ्यातून केलेली भक्कम तरतुद याद्वारे संस्थेचा स्वनिधी मजबूत केला आहे. यामध्ये संचालक मंडळाचे धोरण महत्वाची भुमिका बजावते आहे.

संस्थेला भक्कम आर्थिक स्थितीत नेण्यासाठी स्वनिधीची महत्वाची भुमिका जाणुन संस्थेला बाह्यनिधीवर कमीत कमीत अवलंबून राहावे लागेल हा विचार संचालक मंडळाचा आहे. त्यामुळे स्वनिधीच्या वाढीसाठी संचालक मंडळ जाणीवपूर्वक कार्य करीत आहे. निव्वळ नफा विभागणीतून अधिकाधिक रक्कम निधीस वर्ग करुन निधी वाढीवर काम केले गेले. आर्थिक वर्ष अखेर संस्थेचा स्वनिधी एकूण रक्कम रु. १४९,७८,३३,०४८=०९ एवढी आहे. या आर्थिक वर्षात स्वनिधीमध्ये रु. १९,४६,४६,९२१=९९ म्हणजेच १४.९४ % ने वाढ झाली. ही संस्थेची भक्कमता दर्शविते.

### खेळते भांडवल

आर्थिक वर्ष अखेर संस्थेचे खेळते भांडवल रु.१६०६,३४,१०,४९१=५६ इतके आहे. मागील आर्थिक वर्ष अखेर ते रु.१५३२,१०,७५,९३५=८५ इतके होते. आर्थिक वर्षात त्यामध्ये रु. ७४,२३,३४,५५५=७१ ने वाढ झाली. खेळतेभांडवल वाढीचे प्रमाण ४.८४ टक्के आहे.

### संस्थेचा मिश्र व्यवसाय

मागील वर्षी संस्थेचा मिश्र व्यवसाय रु.२१९८,९७,४६,५५८=३५ च्या तुलनेत या आर्थिक वर्षी संस्थेचा मिश्र व्यवसाय रु.२२६८,२२,०६,७४६=८१ इतका झाला. संस्थेच्या मिश्र व्यवसायामध्ये रु.६९,२४,६०,१८०=४६ ने वाढ झाली. वाढीचे प्रमाण ३.१५ टक्के राहिले आहे.

### संस्थेचे एकूण उत्पन्न

संस्थेने आर्थिक वर्षाचे अखेरीस उत्पन्नाचा रु.१४४,९१,५३,५६५=१० इतका उच्चांकी टप्पा गाठला आहे.मागील वर्षीचे एकूण उत्पन्न रु.१४४,८२,३०,४९०=७६ मध्ये या आर्थिक वर्षात रु.९,२३,०७४=३४ ने वाढ दर्शवित आहे.

कर्जावरील व्याजातून संस्थेला रु.१११,६४,३१,०६२=७२ इतके तर गुंतवणुकीवरील व्याजापासून रु.३२,२९,१०,५२१=९९ इतके उत्पन्न मिळाले. उत्पन्न मार्गाचा संस्थेने कौशल्याने वापर केला.

वाढत्या आर्थिक प्रगतीबरोबर काही घटकामध्ये खर्चाचे प्रमाण वाढून देखील संस्थेच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. ठेवीवर सतत वर्षभर चढ्या व्याजदराने व्याज देवून सभासदांचा आर्थिक लाभ करुन देखील संस्थेच्या उत्पनात वाढ दिसते आहे. हे संस्थेने अनावश्यक खर्चात कपात केल्याचे दर्शविते. उत्पन्न वाढीसाठी संस्थेने अन्य पर्यायाचा अभ्यास केला. सभासदांवर कोणतेही अनावश्यक खर्च टाकले नाहीत. खर्चाचा नियमीत आढावा घेऊन खर्चावर चांगले नियंत्रण ठेवत असताना उत्पादक किंवा संस्थेच्या नांवलौकीकासाठी जे खर्च करणे गरजेचे वाटते ते खर्च संस्थेने केले.

**रु.१०० कोटी ठेव व्याजातून सभासदांची समृध्दी**

ठेवीवरील व्याजाच्या रुपाने संस्थेने रु.१०१,७७,४३,०४२=०० इतका खर्च केला असला तरी दुसऱ्या बाजुला इतक्याच रकमेची सभासदांच्या संपत्तीची वृध्दी संस्थेने केली आहे.

**ढोबळ नफा**

अनेक कारणांमुळे वसुलीमध्ये अडचणी आल्या. परंतु सेवकांनी चांगले प्रयत्न करुन वसुली केल्यामुळे संस्थेला समाधानकारक नफा मिळविण्यात यश आले. योग्य नियोजनामुळे ठेव व्याज आणि कर्ज व्याजातील दुरावा योग्य राखता आला. त्याचाही परिणाम आपणास चांगला ढोबळ नफा मिळविण्यात झाला. त्याच बरोबर संस्थेच्या निधीचे योग्य व्यवस्थापन करता आल्यामुळे संस्थेच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

आर्थिक वर्ष सन २०२५- २०२६ मध्ये संस्थेला रु,१०,३५,६३,४९१= ०७ इतका ढोबळ नफा झाला. संस्थेने अनावश्यक खर्च चांगल्या पध्दतीने टाळले आहेत. कर्जदारांनी दिलेला शब्द न पाळल्यामुळे कर्जावरील व्याज वसुलीमध्ये अडचणी आल्या. त्यामुळे मागील वर्षाच्या तुलनेत ढोबळ नफा कमी झाला. पण समाधानकारक नफा मिळविण्यामध्ये आपण यशस्वी झालो आहोत. पण येणाऱ्या आर्थिक वर्षात राहिलेल्या व्याजाची चांगली वसुली होवून नफा वाढेल अशी खात्री आहे.

**ढोबळ नफ्यातून नियमास अनुसरुन खालील तरतुदी**

संचालक मंडळाने रु.४,०९,२२,९७०=०७ इतक्या रकमेच्या निव्वळ नफा पुर्व तरतुदी करण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | ऑडीट फी देणे तरतुद | १००,००,००० = ०७ |
| २ | देणे नोकर ग्रॅज्युईटी फंड | ५६,००,००० = ०० |
| ३ | सेवकांना क्लोजिंग अलौंन्स | १,२९,११,४८५ = ०० |
| ४ | सेवक बोनस अनुदान | १,२४,११,४८५ = ०० |
|  | एकूण | ४,०९,२२,९७० = ०७ |

**सन २०२५ - २०२६ च्या निव्वळ नफ्याची संभावीत विभागणी**

तरतुदी करुन आर्थिक सालात संस्थेला रु. ६,२६,४०,५२१=०० चा निव्वळ नफा झाला. मागील शिल्लक नफा रु.१,३८,०८,३४९=६७ सह एकूण रु.७,६४,४८,८७०=६७ इतका निव्वळ नफा शिल्लक आहे. त्याची विभागणी पुढील प्रमाणे करणेची संचालक मंडळाची शिफारस आहे.

## निव्वळ नफयाची विभागणी

| तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|
| मागील वर्षाचा नफा | १,३८,०८,३४९=६७ |
| चालू सालाचा निव्वळ नफा | ६,२६,४०,५२१=०० |
| विभागणी साठी एकूण निव्वळ नफा | ७,६४,४८,८७०=६७ |
| **वजा निर्धारीत तरतुदी** | |
| राखीव निधी २५ % | १,५६,६०,१३०=२५ |
| सभासदांना लाभांष १२ % प्रमाण | ६,०७,६४,४३८=४० |
| **अन्य तरतुदी** | |
| सभासद कल्याण निधी | २४,०००=०० |
| शिल्लक नफा ताळेबंदास वर्ग | ३०२=०२ |

या प्रमाणे नफ्याची प्रभागणी केली आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी

## अपेक्षीत लाभांष देण्याची परंपरा कायम

कर्मवीर पतसंस्थेकडून लाभांषाबाबतीत सभासदांची नेहमीच अपेक्षा असते. ती अपेक्षा पुर्ण करण्यात या वर्षीही संचालक मंडळाने सकारात्मक भुमिका ठेवलेली आहे. हीच परपंरा कायम ठेवत संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०२५ - २०२६ साठी १२% लाभांष देण्याची तरतुद केली आहे. त्यास आपण मंजुर द्यावी. आपण मंजुरी देताच लाभांष आपल्या खात्यावर जमा होईल.

## गुंतवणूक व निधीचे व्यवस्थापन

आलेल्या ठेवी व कर्ज वितरण यामधुन शिल्लक राहिलेल्या निधीचे योग्य व सुरक्षित व्यवस्थापन हे संस्थेचा नफा व निधीची सुरक्षिततेच्या यामध्ये महत्वाची भूमिका बजावत असते. कारण हा निधी फार मोठा आधार असतो. त्यामुळे रोखता, तरलता, सुरक्षितता, उत्पन्न क्षमता या बाबी विचारात घ्याव्या लागतात. कधी कधी ही गुंतवणूक संस्थेच्या एकूण कर्जाइतकी सुद्धा असू शकतो. त्यामुळे त्याचे नियोजन विचारपुर्वकच करावे लागते. हा निधी म्हणजेच संस्थेची अन्य बँकात असणारी गुंतवणुक होत.

संस्थेने आर्थिक वर्षात निरनिराळया बँकाच्या अर्थिक स्थितीचा आढावा घेऊन केलेली एकूण गुंतवणुक रु.५०५,४७,०३,५९२=०० इतकी आहे. त्यापैकी रु.१००,००,४८,५९२=०० इतकी गुंतवणुक ही राखीव निधी पोटी स्वतंत्रपणे केलेली आहे. तर रु.४०५,४६,५५,०००=०० इतकी गुंतवणुक वैधानिक तरलतेपोटी केलेली आहे. ही रक्कम संस्थेला मागताक्षणी उपलब्ध होणारी आहे. या गुंतवणूकीचे एकूण ठेवीशी प्रमाण ३९.०८% इतके आहे. संस्थेने निर्धारीत प्रमाणापेक्षा रोखता व तरलता प्रमाण सतत जादा ठेवली आहे. गुंतवणूकीचे योग्य नियोजन झाल्यामुळे संस्थेला यातून रु.३२,२९,१०,५२१=९९ इतके उत्पन्न मिळाले. त्याचा सरासरी परतावा दर ८.१३ % आहे. तर एकूण उत्पन्नात या उत्पन्नाचे प्रमाण २२.२८% आहे.

## एन पी ए व थकबाकी

आर्थिक वर्ष सन २०२५ - २०२६ मध्ये वसुलीची स्थिती आव्हानात्मक राहिली. कर्जदारांनी दिलेले शब्द मार्च पर्यत पुढे नेला व शेवटी अनेक कर्जदारांनी समोरुन येणाऱ्या रकमा न आल्याचे कारण देत कर्जाचा हप्ता रक्कम मार्च पुर्वी न भरल्यामुळे संस्थेला वाढीव एन पी ए च्या प्रमाणाला सामोरे जावे लागले. संस्थेचे नेट एन पी ए चे प्रमाण २५.८७ टक्के राहिले आहे. शासकीय लेखापरिक्षणाच्या सुचनेनुसार कर्जाचे नुतनीकरण न करता प्रत्यक्ष वसुली केली आहे. येणे व देणेच्या आवश्यक त्या तरतूदी पूर्णत्वाने केलेने त्याचा परिणाम एन.पी.ए. मध्ये वाढ व नफ्यावर परिणाम झाला आहे. पण या गोष्टीचा लाभ पुढील वर्षाला मिळणार आहे.

कर्ज हप्ते वसुली साठी संस्थेच्या सर्व सेवकांनी चांगले प्रयत्न केले. कर्ज वसुली विभागाकडे मनुष्यबळ वाढवून देण्यात आले आहे. त्याच सोबत शाखाधिकारी व शाखेतील अन्य सेवक यांना वसुलीचे कामकाज विभागुन देवून कर्ज वसुलीसाठी प्रयत्न केले गेले. कर्ज वसुलीचे सुक्ष्म नियोजन केले आहे. हे नियोजन असेच कायम स्वरुपी ठेवण्यात आले असून त्यामुळे चालू आर्थिक वर्षात चांगली वसुली अपेक्षीत आहे. येत्या वर्षात एन पी ए चे प्रमाण कमी ठेवण्यावर संचालक मंडळाने भर दिला आहे. वसुलीच्या विभागवार मिटींग घेऊन कर्जाचा आढावा घेणे, खातेदारांना संचालक सभेपुढे बोलावणे याद्वारे संचालक मंडळ काम करीत आहे.

ज्या कर्जदारांनी नम्रपणे विनंती करुन देखील हप्ते भरले नाहीत. त्यांच्यावर दावे दाखल करुन वसुली करण्याचा निर्णय संचालक मंडळाला घ्यावा लागत आहे. वसुलीसंबंधी विविध कायद्यांच्या अंतर्गत दावे दाखल करुन वसुलीचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी संस्था लक्षपुर्वक प्रयत्न करीत आहे. येत्या वर्षअखेर कमीत कमी थकबाकी ठेवण्याचे लक्ष ठेवून संस्था त्या दिशेने प्रयत्न करीत आहे. थकीत कर्जदारांविरुध्द वेळेत कारवाई करुन दाखले मिळविण्यासाठी संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुली अधिकारी, शाखाधिकारी यांच्यामध्ये योग्य समन्वयातून काम सुरु आहे. वसुली संदर्भात शाखाधिकारी यांना नियमित मार्गदर्शन केले जात असून कामकाजाचा आढावा संचालक मंडळ सभेत नियमित घेतला जात आहे.

संस्थेकडे मार्च २०२६ अखेर एनपीए पोटी केलेली तरतुद रु.४२,३०,००,०००=०० इतकी व उत्तम जिंदगीवरील तरतुद रु.३,००,००,०००=०० अशी एकत्रित रु. ४५,३०,००,०००=०० इतकी तरतुद आहे.

### कर्ज वसुली पध्दतीमध्ये बदल

पुर्वी सभासदांना वार्षिक पध्दतीने हप्ता भरण्याची पध्दत होती. सभासदांच्या व्यवसायाचे स्वरुप, उत्पन्न मार्गाचा विचार करता ती त्या त्या काळात बरोबर देखील होती. संस्था देखील हे समजून घेत होती. कारण कर्जदार मार्च अखेर कर्जाचे हप्ते भरत होते. ही पध्दत सभासदांच्या सोईची होती. पण मागील कांही वर्षात पतसंस्थांना एन पी ए संकल्पना लागू झाली आणि वार्षिक हप्ते भरणे ही संकल्पना कालबाह्य होवून मासिक हप्ते भरले पाहिजेत ही संकल्पना सुरु झाली आहे. ६ मासिक हप्त्यापेक्षा जास्त हप्ते थकल्यास खाते एन पी ए होवू लागले आहे. त्याचा तोटा संस्थाना होत आहे. त्यामुळे अनेक संस्थांनी कर्जास मासिक हप्ता पध्दत सुरु केली आहे. आपणही शासनमान्य तीच पध्दत अवलंबली आहे. त्यामुळे कर्जदारांनी कर्जाचे मासिक हप्ते भरुन सहकार्य करावे. त्यातून कर्जाचे व्याज कमी होणे, वेळेत कर्ज परतफेड, दंड व्याज न भरावे लागणे असे सभासदाचे फायदे आहेत. तसेच संस्थेची देखील अनावश्यक तरतुदीपासून मुक्तता होऊन संस्थेच्या आर्थिक आरोग्यास बळकटी मिळणार आहे. तसेच गरजू सभासदांना पुन्हा कर्ज वितरण करता येणार आहे.

### सभासदांना वेळेत रक्कमेची उपलब्धता

ठेवीदार, सभासदांना विनाविलंब रक्कमेची उपलब्धता होईल यावर संस्थेचे पुर्ण लक्ष आहे. आज अखेर पैसे वेळेत मिळत नाहीत ही तक्रार संस्थेने येऊ दिली नाही. इतके रोख व्यवस्थापन संस्थेने केले आहे. दैनंदिन पध्दतीने रोख रकमेचा व बँक शिलकीचा आढावा घेतला जातो. त्याद्वारे कमी असणाऱ्या शाखेस रकमेचा पुरवठा करणे, जास्त शिल्लक असणाऱ्या शाखेतून अथवा बँकेतील रकमेचे नियोजन लावले जाते. शाखांना व्यवहाराचा आढावा घेऊन शिल्लक रकमेची मर्यादा ठरवून दिली आहे. तसेच सभासदांच्या सोईसाठी सुरक्षेची सोय असलेल्या कार्यालयाच्या ठिकाणी शाखांना रक्कम मिळण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे सभासदांना विना विलंब रक्कम मिळते. हे करीत असताना संस्थेने दैनंदिन तत्वावर ठेवावयाचे कॅश रिझर्व्ह रेशो (CRR ३.३१%) व स्टॅट्यूटरी लिक्वीडीटी रेशो (SLR ३९.०८ % ) ही वर्षभर योग्य ठेवला आहे.

### ग्राहक सेवा

आमचे सभासद, ग्राहक यांच्या गरजा, त्यांच्या समस्या आणि अपेक्षा आम्ही नम्रपणे समजुन घेऊन त्यांना योग्य तत्पर व समाधानकारक सेवा देण्याचे कार्य करीत आहोत. आमच्या सभासदांना विनम्र व आदरपुर्ण तत्पर सेवा, त्यांच्या व्यवहाराची त्यांना अचुक आणि पारदर्शक माहिती देणे, त्यांच्या तक्रारीचे निवारण करणे, त्यांचा विश्वास आणि माहितीची गोपनियता पाळणे आमच्यासाठी महत्वाचे आहेत. ग्राहकांच्या समाधानातच आम्ही आमच्या यशाचे मुल्यमापन करतो.

### सभासद हीच आमची शक्ती

आपल्या संस्थेची १ लाखाच्या दिशेने जाणारी सभासद संख्या ही आपली ताकद आहे. सभासदांचे संस्थेच्या प्रगतीत महत्वाचे योगदान आहे. त्यांनी संस्थेवर दाखविलेला विश्वास हा शब्दापलीकडील आहे. एवढेच आम्ही म्हणू शकतो. या वर्षात सभासदांनी मोठया संख्येने भाग खरेदी केले. त्यामुळे संस्थेचा आर्थिक पाया मजबूत होण्यास मदत झाली आहे.त्यांच्या सहकारात्मक भुमिकेमुळे संस्थेने अनेक विकासात्मक योजना त्यांच्यासाठी राबविल्या आहेत. संस्थेच्या सर्वच कार्याला सभासदांचे मनापासून सहकार्य मिळाले आहे. त्यांच्या सहकार्याने संस्थेची विश्वासार्हता, स्थैर्य आणि प्रगती होत आहे. अशा सहकार्याच्या बळावर संस्थेला भविष्यात सेवेची प्रगती कायम राखण्यात मदत होईल.

### सभासदांच्या माहितीची सुरक्षा

संस्थेचे कामकाज ऑनलाईन कोअर बँकींग पध्दतीने अतिशय चांगल्या पध्दतीने सुरु आहे. संस्था सभासदांना इतरही सुविधा देत आहे. त्यामुळे या आधुनिक जगाच्या सेवेसोबत धोके देखील वाढलेले आहेत. त्यामुळे संस्थेला या धोक्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी संस्थेने फायरवॉल सेवा पुरविणाऱ्या कंपनी सोबत सुरक्षा करार केला. यामुळे संस्थेची संपुर्ण संगणक व्यवस्था फायरवॉल या साधनाने

सुरक्षित झाली आहे. आता संस्थेला जलद आणि सुरुक्षित सेवा देणे अधिक सुरक्षित होणार आहे.झालेल्या वर्षात संस्थेच्या तंत्रज्ञानाध्ये सुधारणा करण्यासाठी अनेक निर्णय घेतले गेले. त्यातून सुरक्षा , जलदगती व्यवहार याचा सभासदांना लाभ होणार आहे. युपीआई सेवा घेण्यासाठी आमची बोलणी अंतिम टप्प्यात असून याचा भार सभासदांच्यावर पडू नये तो कमीत कमी कसा करुन घेता येईल यावर आम्ही चर्चा करीत आहोत.

अन्य आर्थिक संस्थामध्ये घडलेल्या सायबर घटनांची माहिती संस्थेच्या सेवकांना देवून अशा पध्द्रतीचा कोणताही चुकीचा व्यवहार किंवा पध्दती आपल्या बाबतीत घडू नये व सभासदांचे व संस्थेचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून सभासदांना याची माहिती देणे व जागरुकता आणुन सभासदांचे हितरक्षण करण्याकरिता संस्था प्रयत्न करीत आहे.

### नविन मार्गदशक परिपत्रके

गेल्या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य बिगरशेती सहकारी पतसंस्था नियामक मंडळाच्यावतीने पतसंस्थांसाठी अनेक नियम व मार्गदर्शक तत्वे समाविष्ठ असलेली परिपत्रके प्रसिध्द झाली. त्याचा संस्थेने वेळीच अभ्यास करुन त्या सुचनांचा संस्थेच्या कामकाजात वापर केला आहे. ही परिपत्रके सर्व शाखांमध्ये पोहचवून व त्यावर संचालक मंडळ सभा व सेवक मिटींगमध्ये चर्चा करुन त्यानुसार कामकाज करण्यासाठी संस्थेने देखील सुचना पत्रके काढली यामुळे संस्थेचे काम नियमांच्या आधारे अधिक सक्षम करण्यास आम्हाला मदत होत आहे.

संस्थेचे अंतर्गत तपासणीस यांचे रिपोर्ट मधील दोषांची योग्य पुर्तता करण्याबाबत शाखांना जागरुक करण्यात आले आहे.

### संस्थेस लाभलेले मानसन्मान

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि, मुबंई च्या वतीने सन २०२५ करिता संस्थेला रु. १००० कोटी ठेवी वरील गटातून **'' दिपस्तंभ पुरस्कार २०२५''** देवून सन्मानीत करण्यात आले . दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी गोकर्ण महाबळेश्वर येथे महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील पतसंस्थाच्या संपन्न झालेल्या सोहळयात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संस्थेचे चेअरमन , व्हाईस चेअरमन व संचालक यांना जिल्हा, आंतरजिल्हा व राज्य पातळीवरील विविध सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निमित्ताने संस्थेचे प्रमुख या नात्याने प्रमुख पाहुणे, कार्यक्रमाचे अध्यक्ष व विशेष उपस्थिती याद्वारे विविध मंचावरती उपस्थित राहण्याचा मान लाभला.

### अंतर्गत नियंत्रणाची पध्दत

कोणत्याही संस्थेच्या अंतर्गत नियंत्रणावरुन त्या संस्थेचे योग्य नियोजन, कामातील पारदर्शकता आणि कामाची जबाबदारी कशा पध्दतीने आहे हे ठरते. आम्ही संस्थेच्या सर्व मालमत्तांची काळजी घेण्याला अग्रक्रम देतो. संस्थेतील जमाखर्चाच्या नोंदी ज्या त्यावेळी होतील याला महत्व दिले जाते. त्यावर योग्य नियंत्रण ठेवले आहे. सभासदांची कोणतीही गैरसोय होणार नाही यासाठी त्यांच्या तक्रारीचे वेळेत निरसन होईल याला आम्ही प्राथमिकता देतो.

संस्थेची उद्दीष्टये साध्य करताना नियमांची चौकट सांभाळुन काम करण्यावर संस्थेने भर दिला आहे. त्याद्वारे खर्चावर योग्य नियंत्रण, लेखापरिक्षकांनी केलेल्या सुचनांची नोंद घेऊन दोष निवारणासाठी प्राथमिकता देत असताना सभासदांच्या सुलभ व्यवहाराला आम्ही महत्वाचे स्थान दिले आहे.

### संस्थेचे कामकाज ६ विभागामध्ये

संस्थेच्या कार्यावर प्रभावी नियंत्रण राहणेसाठी, प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी तसेच शाखांना वेळेवर मार्गदर्शन करण्यासाठी संस्थेची सांगली, पलुस, मिरज, आष्टा, जयसिंगपूर व हातकणंगले अशा ६ विभागामध्ये विभागणी करण्यात आली आहे. यामार्फत शाखांच्या कामकाजावर देखरेख, धोरणांची अंमलबजावणी, रोख व अन्य गोष्टीचे नियंत्रण व ग्राहकांच्या अडचणींचे निवारण तत्काळ होईल याची व्यवस्था केली आहे.

या कार्यालयामार्फत कर्जवाटप, वसुली, ठेव उद्दीष्ट यावर काम करण्यात येत आहे. या मुळे निर्णय प्रक्रियेमध्ये गती आली आहे.

### व्यवस्थापनाचा नांवलौकीक

आपल्या संस्थेने सुरुवातीपासूनच शिस्तबध्द व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, सभासद, सेवक यांच्यासाठी विविध योजना, सामाजिक कार्याला मदत, चांगला लाभांष, पुरस्कार वितरण अशा उत्तम गोष्टींचा अंगीकार केला आहे. त्यामुळे सर्वत्रच आपल्या संस्थेच्या विविधांगी कार्याचे कौतुक होत असते.

या कार्याची दखल घेऊन आपणांस यावर्षी आणि यापुर्वीही अनेक सन्मान प्राप्त झाले. यातुन संस्थेचा नांवलौकीक आहे. याचमुळे बऱ्याच भागातून विविध संस्थांचे पदाधिकारी, सेवक यांनी संस्थेस सदिच्छा भेट देवून माहिती घेतली. त्यामध्ये संस्थेची कार्यपध्दती, कर्ज व्यवस्थापन, वसुली प्रक्रिया, अंतर्गत कामकाज, संस्थेच्या कार्यात तंत्रज्ञानाचा वापर, कर्मचारी व्यवस्थापन याची माहिती घेतली. संस्था सभासदकेंद्रीत कामकाज करीत असल्याबद्दल कौतुक केले. भविष्यातही संस्था याच मार्गाने प्रगती करील याची ग्वाही सभासदांना देतो.

### विद्यार्थ्यासाठी माहितीचा स्त्रोत

आपल्या वैशिष्ट्यपुर्ण कार्यपध्दतीची दखल घेत विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी, व्यवस्थापन शाखेच्या विद्यार्थ्यांनी संस्थेस भेटी दिल्या. संस्थेच्या कामकाज पध्दतीची माहिती घेऊन त्यावर प्रोजेक्ट सादर केले. या विद्यार्थ्यांना संस्थेच्या अधिकाऱ्यांनी कामकाजाची संपुर्ण माहिती दिली. त्यावर आम्ही अनेक भेटी दिल्या पण एवढी सखोल माहिती कोठेही मिळाली नाही. अशा बोलक्या प्रतिक्रिया देवून भविष्यात अभ्यास भेटीसाठी कर्मवीरचीच निवड करु अशी इच्छा व्यक्त केली.

कॉलेज अंतर्गत राज्य व देश पातळीवरील संशोधन प्रबंधासाठी संस्थेने अशा संशोधकवृत्तीच्या विद्यार्थ्यांना मॉडल निर्मितीसाठी सर्वतोपरी सहकार्य केले.

### सभासदांसाठी सतत नाविन्यापुर्ण काम

आमच्या कुटूंबातील दरवर्षी नविन काहीतरी भेट देण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत असतो. त्यासाठी वर्षभर आर्थिक क्षेत्रात घडणाऱ्या बदलावर आणि तंत्रज्ञानावर आमचे लक्ष असते. बऱ्याच वेळा याचा खर्च सभासदांना सहन करावा न लागता तो संस्थेनेच करुन अल्पदरात अशा अनेक सेवा फक्त सभासदांच्या सोईसाठी संस्था निर्माण करुन देत आली आहे.

NEFT/RTGS/MOBILE BANKING/PIGMI APP/ SMS/ CORE BANKING या सेवातर संस्था. सुरुवातीपासुनच देत आहे. यावर्षी संस्थेने सभासदांच्या सोईसाठी फ्रँकीग (स्टँम्प मिळण्याची सुविधा ) सेवा उपलब्ध करुन दिली असून ही सेवा संस्थेच्या शाखा कोल्हापूर रोड, सांगली, जयसिंगपूर, मिरज, आष्टा, पलुस येथे उपलब्ध करुन दिली आहे. ही सेवा उपलब्ध करुन देणारी आपली संस्था पहिली संस्था आहे. यामुळे सभासदांचे श्रम कमी झाले असून अल्पदरात ही सेवा उपलब्ध करुन दिल्यामुळे सभासदांना त्याचा लाभ होतो आहे याचा आम्हाला आनंद आहे.

सभासदांना सतत विविध ठेव योजना देवून त्यांच्या गुंतवणूकीस पर्याय उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे ठेवीदारांनी संस्थेकडे गुंतवणुक करण्यास पसंती दिल्याचे जाणवले. तसेच संस्थेच्या ८ शाखांमध्ये सेफ डिपॉझीट लॉकर सुविधा उपलब्ध केली असून सभासदांचा त्याला चांगला प्रतिसाद आहे. आमच्या सौजन्यपुर्ण सेवेमुळे लॉकर संख्या वाढवावी अशी सभासदांची मागणी आहे.

### सहकारातून सभासद हित

**'एकासाठी सर्व आणि सर्वासाठी एक'** हा सहकाराचा मुलमंत्र मनामध्ये घेऊन आपण सर्वजण काम करीत आहोत. आपली संस्था सभासदांचे आर्थिक, सामाजिक हित जपण्यासाठी प्रयत्न करीत आहे. सहकाराने दिलेला मंत्र म्हणजे स्वावलंबन व आर्थिक सुरक्षा हाच सभासदासाठी आर्थिक पाया निर्माण करुन देण्यासाठी संस्था कार्य करीत आहे.

अल्पदरात कर्जपुरवठा, बचतीला प्रोत्साहन, सामाजिक उपक्रमांना सहकार्य, अपघात विमा, आरोग्य शिबीर, शैक्षणिक मदत, अल्पदरात विविध सेवा पुरविणेसाठी विविध योजना आणणे याद्वारे संस्था सहकारातून सभासदांचे हित जपत आहे.

### कर्जास अपघाती विमा संरक्षणाचा लाभ

संस्थेने रु. ५० लाखाच्या आतील कर्ज रकमेस विमा कवच योजना लागू केली आहे. त्यामुळे एखाद्या कर्जदारावर कांही अपघाती प्रसंग ओढवल्यास त्यांना रु. ५० लाखापर्यंत आर्थिक मदत मिळू शकते. या विमा संरक्षणाचा लाभ काही कर्जदारांच्या कुटूंबियांना मिळाला. या योजनेबाबत अनेक पतसंस्थांनी आपल्याकडून माहिती घेऊन त्यांनी देखील ही योजना त्यांच्या संस्थेमध्ये राबविली. यामध्ये विमा रक्कम ७५ लाखांपर्यंत अपघात विमा करणेबाबत आमची बोलणी सुरु होती त्यास मान्यता मिळून ही मर्यादा रु. ७५ लाख झाली आहे.

### जेष्ठांना आधार

कर्मवीर परिवारामध्ये जेष्ठ सदस्यांचा मनापासून आदर आहे. त्यामुळे कर्मवीर कडून सेवा घेण्यासाठी जेष्ठ नागरीक आनंदी आहेत. जेष्ठ हे आपला अनुभव, ज्ञान आणि आचार विचारांचे समृध्द भांडार असतात. त्यांच्या उतार वयातील जीवन अधिक सुखकर व सन्मानजनक होण्यासाठी संस्थेने त्यांच्यासाठी घरपोच सेवा आणि ठेवीच्या व्याजामध्ये जादा सवलत योजना नियमित सुरु ठेवली आहे.

व्याजावर होणाऱ्या अतिरिक्त खर्चापेक्षा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आम्हाला समाधान देतो.त्यामुळे जेवढे जेष्ठ सभासद संस्थेला भेटी देतात तेवढा आम्हाला आनंद येतो. त्यांना सेवेचा लाभ घेता यावा म्हणून त्यांच्यासाठी घरपोच सेवा, प्राधान्याने सेवा आणि आवश्यक ते सहाय्य देण्यासाठी आमचे कर्मचारी तत्पर आहेत. भविष्यातही त्यांना जास्तीत जास्त सेवा व आधार कसा देता येईल याची आम्ही काळजी घेऊ.

**संचालक मंडळ योगदान**

संस्थेच्या आजपर्यंतच्या प्रगतीमध्ये संस्थेच्या संचालक मंडळाचे योगदान महत्वपुर्ण राहिले आहे. कर्मवीर परिवारातील सभासद , ठेवीदार, कर्जदार, सेवक यांच्या आर्थिक उन्नतीसाठी संचालक मंडळाने दुरदृष्टी, पारदर्शकता आणि जबाबदारी याचा विचार करुन सातत्याने आपला वेळ देवून मार्गदर्शन केले आहे.

वर्षभरात त्यासाठी संचालक मंडळाच्या ३५ सभा संपन्न झाल्या. या व्यतिरिक्त संचालक मंडळाने संस्थेसाठी खुप वेळ व श्रम दिले आहेत. संस्थेची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी संचालक मंडळाने चांगले प्रयत्न केले. सभासद, ठेवीदार आणि ग्राहक यांच्या हिताचे अनेक निर्णय संचालक मंडळ सभेमध्ये आवर्जून घेण्यात आले. बदलणाऱ्या आर्थिक जगाचा कानोसा घेऊन येणाऱ्या धोक्याबाबत संचालक मंडळ जागृत दिसून आले व त्यांनी नियमांचे पालन व सुशासन याचा सतत आग्रह धरल्याचे दिसले.संचालक मंडळाने व्यवस्थापनामध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी महत्वाच्या सुचना दिल्या. त्याची अंमलबजावणी करण्यात आली. संस्थेची गुणवत्ता, कार्यक्षमता व ग्राहक सेवा यावर संचालक मंडळाने विशेष कार्य केले. संस्थेचे तंत्रज्ञान सुधारणा , कर्मचारी गुणवत्ता व संस्थेला बळकटी यावी यासाठी संचालकांनी मनापासून सहकार्य केले.सभासदांचे आर्थिक हित जोपासणे, त्याची आर्थिक, सामाजिक उन्नती साध्य होईल अशा निर्णयांना प्राधान्य देणे, त्यांना बचतीचे महत्व पटविणे, कर्जाचा विनियोग योग्य होईल यावर लक्ष ठेवणे, त्याचबरोबर सहकार खात्याने काढलेल्या परिपत्रकांनुसार कामकाज करुन नियमांचे पालन करणे यासाठी संचालक मंडळानी आपली भुमिका स्पष्टपणे निभावली आहे.

आर्थिक वर्षात संचालक मंडळाने विविध शाखांना भेटी देवून चाललेल्या कामाचा आढावा घेतला. सभासदांचा विश्वास संपादन करुन संस्थेचा नावलौकीक वाढविण्यामध्ये संचालक मंडळाचे महत्वपुर्ण योगदान लाभले. त्यांच्या बहुमुल्य योगदानाबद्दल मी त्यांना धन्यवाद देते.

**आचारशील मनुष्यबळ**

आपल्या संस्थेला सौजन्यशील व सेवाशील मनुष्यबळ लाभलेले आहे. संस्थेला लाभलेले मनुष्यबळ हे सरासरी २५ ते ३० वयोगटातील असलेने त्यांचा कामातील उत्साह वाखाणण्याजोगा आहे. सेवक हा देखील संस्थेचा एक आधारस्तंभ आहे. आम्हाला जेवढे म्हणून सभासद , ठेवीदार भेटतात ते सर्व संस्थेच्या सेवकांनी दिलेल्या सेवेबद्दल त्यांचे कौतुक करतात. खरेच कर्मवीरला चांगला सेवक लाभलेला आहे ही भावना व्यक्त करतात. यावरुन आमच्या मनुष्यबळाची क्षमता लक्षात येते. या मनुष्य बळाचे ज्ञान व कौशल्यवृध्दी करुन त्यांना सक्षम करण्याच्या दिशेने संस्थेने आर्थिक वर्षात अनेक चांगले प्रयत्न केले आहेत. यापुढेही करीत राहणार आहे. सेवकही नविन संकल्पना स्वीकारण्यास उत्साही आहेत. या वर्षात सेवकांची कौशल्यवृध्दी व बदलते तंत्रज्ञान व परिपत्रके याची माहिती देण्यासाठी १० प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले.त्यामध्ये अनुभवी प्रशिक्षण केंद्राकडून विविध विषयाचे प्रशिक्षण देण्यात आले. सेवकांच्यामध्ये आत्मविश्वास वाढविणे, त्यांचे ज्ञान वाढविणे, त्यांच्यामध्ये व्यावसायिक गुणवत्ता वाढविणे,शिकण्याची प्रवृत्ती जागी ठेवणे, ग्राहक सेवेमध्ये सुधारणा करणे यासाठी हे प्रशिक्षण महत्वाचे ठरत आहे.

